# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ५ जुलै, २०२४**

## जलसंपदा विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १८**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आय-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा**<br>**रूपये:- १,३४,००,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (१) | ६३५४ | १०० | राज्यात यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी, घाटांजी, महागाव तालुके तर नांदेड जिल्ह्यातील माहूर, किनवट गावातून निम्नपैनगंगा प्रकल्पाबाबत काढलेली कलम ११/१ अधिसूचना रद्द करावी व निम्नप्रकल्पाच्या लाभ व बुडीत क्षेत्रात उच्चपातळी बंधारे बांधून होत असलेल्या सिंचनात अधिकभर घालून ४० टक्के एवजी १०० टक्के सिंचन करावे अशी मागणी निम्नपैनगंगाधरण विरोधी संघर्ष समिती व अखिल भारतीय किसान सभा नांदेड जिल्हा समिती यांनी मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री व मुख्यसचिव यांना दि.०९/०९/२०२३ व नायबतहसीलदार आर्णी यांच्या माध्यमातून दि.०२/१०/२०२३रोजी दिलेल्यानिवेदनात दिलेलेअसणे,उक्त निवेदनामध्ये केलेल्या एकूण०८मागण्यानुसार अद्याप शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे,तसेच उक्त धरणास केंद्रीयजलआयोग व केंद्रीय पर्यावरणाची मान्यता नसणे, विशेष चौकशी समितीने (SIT) श्री.चितळे समितीने या प्रकल्पावर आक्षेप घेतला असतानाही पहिल्या टप्प्यातील १८ गावांपैकी १७ गावे पेसा कायद्यातमोडत असतानाही ग्रामसभा न घेता टेंडर नोटीस निघालीअसणे, यवतमाळ व नांदेड या दोन्ही जिल्ह्यातील एकूण गावे ९५ पैकी४४ गावे आदिवासी पेसागावे असून यातील २८ पूर्णतः बाधित व उर्वरित गावे अंशतःबाधित असणे, पेसा कायद्यानुसार पेसागावातील ग्रामपंचायतीचे ठराव सदर प्रकल्पसाठी आवश्यक असतानाही घेतले गेले असणे, तसेच कलम११/१अधिसूचना रद्द करावी व निम्न प्रकल्पाच्या लाभ व बुडीत क्षेत्रात उच्च पातळी बंधारे बांधून होत असलेल्या सिंचनात अधिक भर घालून ४० टक्के एवजी १०० टक्के सिंचन करावे अशी मागणी अखिल भारतीय किसान सभा नांदेड जिल्हा समिती व निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समिती यांनी केलेल्या मागण्या पुर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०२, मृद व जलसंधारण**<br>**रूपये:- १७,८३,२१,६२,०००/-**<br>**श्री. सुभाष धोटे** |
| (२) | ६३७९ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी अनेक मामा तलाव, मध्यम पाटबंधारे तलाव व प्रकल्प, उपसिंचन योजना याव्दारे शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यासाठी कॅनलची निर्मिती करण्यात आलेली आहे. हे अनेक वर्षापासून कॅनल नादुरूस्त असल्यामुळे जवळपास ४० टक्के पाणी वाया जात असल्याने सिंचनावर मोठया प्रमाणात फरक पडत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक व माणसिक त्रास सहन करावा लागत आहे. याकारणास्तव चंद्रपूर जिल्हयातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी अनेक मामा तलाव, मध्यम पाटबंधारे तलाव व प्रकल्प, उपसिंचन योजना याव्दारे शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यासाठी कॅनल एवजी पाईप लाईन टाकण्यासंदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपा◌ायोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (३) | ६४८५ | १० | जागतिक वारसा लाभलेल्या प्रचिन शिवकालीनपूर्व सन 1530 मध्ये तयार करण्यात आलेल्या धामापूर (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) तलावाच्या पाण्याचा काळसे-धामापूर तसेच, मालवण तालुक्यातील दहा-पंधरा गावांना पिण्यासाठी उपयोग होणे तसेच, सदर तलावाचे पाणी भविष्यात सिंधुदूर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळाकडे नेण्याचे शासनाचे नियोजन असल्याचे समजते, सदर तलावात वर्षानुवर्षे आजूबाजूच्या डोंगर उतारावरुन पावसाच्या पाण्याने दगड, माती, गाळ, पाला-पाचोळा वाहून येऊन तलावात साचत असल्याने दिवसेंदिवस तलावाची खोली उथळ होणे, सदरचा गाळ उपसण्यासाठी काळसे-धामापूर गावांतील ग्रामस्थानी सातत्याने मा.जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचेकडे मागणी करणे, उपसा केलेला गाळ शेत-बागायती सखल भागात टाकण्यासाठी जमीन उपलब्ध करुन देण्यास या भागातील ग्रामस्थ तयार असणे, धामापूर (मालवण) येथील तालावातील गाळ उपसा करुन धामापूर-काळसे, तसेच, मालवण तालुक्यातील गावांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने तलावात साचलेला गाळ उपसण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (४) | ६३१५ | १० | मौजे धामापूर (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) गावातील शेतकऱ्यांच्या शेत जमिनींमध्ये कर्ली खाडीचे खारे पाणी भरतीच्या वेळी शेतात शिरुन शेत जमिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, ग्रामस्थानी खारभूमी विभागाकडून धामापूर पोईकालव्यावरील बंधाऱ्याचा बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शासनाकडे पाठविण्यासाठी ‘उप कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग खारभूमी विकास विभाग, कणकवली सिंधुदूर्ग’ यांना नोव्हेंबर, २०२३ मध्ये शेतकऱ्यांच्या शेतजमिनींचे ७/१२ प्रतींसह निवेदन देणे, खारभूमी विभागाकडून धामापूर पोईकालव्यावरील बंधाऱ्याचा बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याबाबत शासकीय अधिकाऱ्यानी सातत्याने केलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, तसेच, शासनाच्या अस्तित्वातील व भविष्यकालीन योजनांमध्ये देखील सदर योजनेचा समावेश न करणे, त्याबाबत योग्य कार्यवाहीस्तव सदरचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडून ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरीत करणे, पाठविण्यासाठी ‘उप कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग खारभूमी विकास विभाग, कणकवली सिंधुदूर्ग’ यांनी सदरच्या कामात दिरंगाई केली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ६३१६ | १० | जागतिक वारसा लाभलेल्या प्रचिन शिवकालीनपूर्व सन 1530 मध्ये तयार करण्यात आलेल्या धामापूर (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) धरणाच्या पाण्याचा काळसे-धामापूर तसेच, मालवण तालुक्यातील दहा-पंधरा गावांना पिण्यासाठी उपयोग होणे तसेच, सदर धरणाचे पाणी भविष्यात सिंधुदूर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळाकडे नेण्याचे शासनाचे नियोजन असल्याचे समजते, धरणा मध्ये मोठया प्रमाणावर गाळ साचला असणे, सदरचा गाळ उपसण्यासाठी काळसे-धामापूर गावांतील ग्रामस्थानी सातत्याने मा.जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचेकडे मागणी करणे, उपसा केलेला गाळ शेत-बागायती सखल भागात टाकण्यासाठी जमीन उपलब्ध करुन देण्यास या भागातील ग्रामस्थ तयार असणे, धामापूर (मालवण) येथील तालावातील गाळ उपसा करुन धामापूर-काळसे, तसेच, मालवण तालुक्यातील गावांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने धरणात साचलेला गाळ उपसण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही. |
| (६) | ६४३८ | १० | कोल्हापूर जिल्हयातील धामगणी प्रकल्पाच्या बॅक वॉटरमधून नियोजित दुर्गमानवाड उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करण्याची गरज निर्माण झाली असणे, सदरच्या योजनेच्या सर्वेक्षणाच्या कामास शासनाने तत्वत: मान्यता दिली असणे, तथापि सर्वेक्षण योजनेचे लाभ क्षेत्र ६०० हेक्टर पेक्षा जास्त होत असल्याचे निदर्शनास आले असणे, जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग कोल्हापूर यांच्याकडून सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणावर आधारित अचूक पाण्याची मागणी प्राप्त झाली नसणे, पाण्याची मागणी प्राप्त करुन घेण्याची आवश्यकता असणे, सदर योजनेस पाणी उपलब्ध प्रमाणपत्र देणे व दुर्गमानवाड उपसा सिंचन योजना राबविण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७००, मोठे पाठबंधारे**<br>**रूपये:- १७,८३,२१,६२,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (७) | ६४४२ | १० | "विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्प योजनेअतंर्गत असोला मेंडा क्र.-2 या मुख्य कालव्यावर सावली द्वारा येरगाव, खेडी, अजंनगाव, सावली येथे लघु कालव्याचे प्रत्यक्ष काम न करताच कार्यकारी अभियंता राजेश सोनने यांनी 7 कोटीहुन अधिक रुपये निधी ठेकेदारास देऊन यामध्ये आर्थिक घोटाळा केल्याचा प्रकार दि.12.6.2024 रोजी उघडकीस येणे,सदरहु गावात लघु कालव्याचे प्रत्यक्षात बांधकामच होऊ न शकल्याने येथील सुमारे 6 हजार हेक्टर जमीनीचे सिंचन होऊ न शकल्याने येथील शेतकर्या चे मोठ्या प्रमाणात झालेले कोट्यावधी रुपयाचे नुकसान,यामुळे शासनाच्या कोट्यावधी रुपये निधीचा झालेला अपव्यय, सदर भ्रष्टाचार प्रकरणात तत्कालीन कार्यकारी अभियंता राजेश सोन यांनी ठेकेदारा बरोबर आर्थिक सगंनमत कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार करण्यात येणे, या आधी सदर राजेश सोन या कार्यकारी अभियंता यांनी चंद्रपूर पाटबंधारे विभागात असपाञताना तेथेही त्यांनी अशाच प्रकारे कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार करण्यात येणे, पंरतु याबाबत शासनाकडे तक्रारी दाखल होऊनही कोणतीच कारवाई न होणे, त्यानंतर आता असोला मेंढा विभाग क्र.2 मध्येही देखील भ्रष्टाचार करण्यात येणे,या सदंर्भात सिद्धेश्वर कोमजवार यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमं, मा.प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र राज्य यांना दि,8.6.2024 रोजी व यापूर्वी अनेकवेळा कारवाईसाठी तक्रार निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडुन कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (८) | ६४११ | १० | पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरणारा व राष्ट्रीय सिंचन प्रकल्पाचा दर्जा दिलेल्या गोसीखुर्द प्रकल्पातील कालवे, शाखा कालवे व वितरकांची कामे निधीअभावी पूर्ण झालेली नसणे, तसेच या प्रकल्पातील असोलमेंढा तलावाची क्षमता वाढविण्याचे काम अद्यापही पूर्ण झालेली नसणे, शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत प्रकल्पाचे पाणी जाण्यासाठी प्रकल्प जून २०२५ अखेर पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन असणे, याकरिता यासाठी दरवर्षी दीड हजार कोटींच्या निधीची आवश्यकता असतांना फक्त ८५३ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर करुन त्यापैकी बराच निधी अद्यापही अखर्चित असल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, हा प्रकल्प पूर्ण करण्याबाबत असलेली शासनाची उदासिनता यामुळे सिंचन क्षेत्रात वाढ होत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नैराश्याची भावना निर्माण झालेली असणे, या प्रकल्पांच्या दिरंगाईस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (९) | ६३५२ | १० | कळंबस्ते, तेलेवाडी, उमरेवाडी धरण, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी येथे धरण गत ३० वर्षापूर्वी बांधले असणे, सदरच्या धरणाला मोठया प्रमाणावर गळती लागली असणे, पाणी गळतीमुळे धरणाला धोका निर्माण झाला असणे, त्याचप्रमाणे धरणातील पाणी साठी कमी होत असणे, पाणीसाठा वाढविण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, यासाठी धरणातील गाळ काढण्याची गरज भासत असणे व गाळ काढण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ६४३५ | १० | सिना नदीवरुन (ता.माढा,जि.सोलापूर) खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीने सन २०२० मध्ये लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असणे, उपसा जल सिंचन योजना अद्याप कार्यान्वित झाली नसणे, सर्वसाधारण आराखडयास मान्यता देण्यात आली असणे, मात्र प्रशासकीय मान्यता मिळाली नसणे, शासनाने सदरच्या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७०१, मध्यम पाटबंधारे**<br>**रूपये:- १७,८३,२१,६२,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (११) | ६३१३ | १० | रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात सर्वात जुन्या चिंचोळी धरणाची मागील दोन वर्षापासून दुरुस्ती सुरु असुन त्याकरिता शासनाकडुन करोडो रुपयांचया निधी खर्च करुन सुद्धा अनेक विविध समस्या निर्माण झाल्यामुळे धरणाचे धोके कमी झालेले नसणे, किंबहुना दुरुस्तीचे काम दरम्यान प्रशासनाच्या संबंधित प्रशासनाच्या यंत्रणांनी दुर्लक्ष केल्याने चिंचोळी धरण परिसरातील शेकडो एकरातील वनसंपदेची तोड, भिंतीची उंची नव्याने वाढवण्यात आली, त्याचबरोबर सांडव्याचे दोन्ही बाजुचे काम व भिंतींचे पिचिंगही हाती घेण्यात आले असतानाच धरणाचे पाणरी साठवण्याच्या दोन्ही कडील बाजुला असलेल्या डोंगर उतारावरील शेकडो एकर जागेत प्रामुख्याने वृक्षतोड मागील वर्षभरातील काळात करण्यात आली असणे, जमिनीची धुप वाढल्याने यंदाच्या पावसाळ्यात धरणातील पाणी साठ्यात जास्त पाण्याची साठवण होण्याची क्षमता संपलेली असणे, शासनाकडुन कोट्यावधीच्या निधीला मंजुरी देऊनही धरणाच्या कामाबाबत संबंधित प्रशासनाच्या बेजबाबदारपणे वागणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ६३१४ | १० | रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील रोहा मार्गावर उमटे धरण सन १९७८ मध्ये बांधलेल्या धरणामुळे ४७ गावांना व ३३ आदिवासी वाड्यांना पेयजलाचा पुरवठा होत असणे, अलिबाग तालुक्यातील रेवदंडा आणि रामराज विभागाला |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पाणी मिळण्यासाठी उमटे धरणाचा एकच पर्याय असून मागील अनेक वर्षापासून या ८७ दशलक्ष लिटर पाणी साठवण क्षमता असलेल्या धरणातील गाळ काढण्यात आलेला नसल्यामुळे धरणाची क्षमता निम्म्याहून कमी होऊन सुमारे ३० दशलक्ष घनफुट वर आलेली असणे, सुमारे ४६ वर्षे जुन्या असलेल्या उमटे धरणाच्या परिसरातील नागरिकांनी पिण्याच्या पाण्यासाठी कडक आंदोलनाचा पवित्रा घेतलेला असणे, तरी आजतागायत त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ६४४० | १० | पंढारी मध्यम प्रकल्प (ता.वरुड,जि.अमरावती) या प्रकल्पाचे उर्वरित काम अपूर्ण अवस्थेत असणे, वर्धा नदीवर पीक अप विअर शिर्ष नियंत्रक व फिडर चॅनलचे बांधकाम व पंढरी धरणाचे मातीकाम, सांडवा मुख्य विमोच व इतर संलग्न कामे माहे जून,२०२३ पर्यंत करण्याचे कंत्राटदारास कळविले असणे, तसेच कंत्राटदारास कालबध्द कार्यक्रम ठरवून दिला असणे, मात्र काम संथ गतीने सुरु असणे, कंत्राटदाराच्या कामाची प्रगती असमाधानकार असणे, कंत्राटदाराला त्या संबंधी वारंवार कळविले असणे, परंतु कंत्राटदार गांभीर्याने घेत नसणे, कंत्राटदार काम करण्यास चालढकल करीत असणे, त्यामुळे कंत्राटदरास काळया यादीत टाकण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७०२, लहान पाटबंधारे**<br>**रूपये:- १७,८३,२१,६२,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१४) | ६४१० | १० | गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यात एकण १० लघु प्रकल्पांना १५ वर्षापूर्वी एकूण ६०० कोटी रुपये मंजूर करण्यात येणे, यापैकी या योजनांसाठी १६२ कोटी रुपये खर्च होऊनही वेगवेगळया कारणांनी कामे बंद पडल्याने शेकडो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली अद्यापही आलेले नसणे, सद्यस्थितीत सालेकसा तालुक्यातील अनेक लघु पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असणे, लघु पाटबंधारे तलाव कहाली हा ३२ लाख ९० हजार एवढ्या सुधारित किंमतीचा असूनही केवळ ३० टक्केच रक्कम खर्च झालेले असणे, प्रकल्पाचे घळभरणी व कालव्यांचे काम अद्यापही अपूर्णावस्थेत असणे, लघुपाटबंधारे तलाव दंडारी हा प्रकल्प ४५ लाख रुपयांपेक्षा जास्त किंमतीचा प्रकल्प असतांना फक्त १५ लाख पर्यंतच रक्कम खर्च झालेली असणे, तसेच लघुपाटबंधारे तलाव मरामजोब हा ३४ लाख ५९ हजार रुपये किंमतीचा प्रकल्प असतांनाही फक्त २४ लाख रुपयांपर्यंत खर्च करण्यात येणे, लघुपाटबंधारे तलाव कारुटोला हा २५ लाख किंमतीचा प्रकल्पामुळे एकूण २६ हेक्टर शेतीला त्याचा लाभ शक्य असतांनाही रोजगार हमी योजनेतून सदर काम |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | वगळण्यात येणे, तसेच लघुपाटबंधारे तलाव मक्काटोला हा २५ किंमतीच्या प्रकल्पामुळे एकूण २६ हेक्टर शेतीला त्याचा लाभ शक्य असतांनाही रोजगार हमी योजनेतून सदर काम वगळण्यात येणे, गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील लघुपाटबंधारे तलावांची रखडलेली काम पुर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ६४१२ | १० | चंद्रपूर शहरातील ऐतिहासिक रामाळा तलावाच्या आजूबाजूच्या परिसरात अतिक्रमण झाल्याने या तलावाचे संरक्षण व संवर्धन करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, नागरिकांनी शासनाकडे माहे मे २०२४ मध्ये वा त्या दरम्यान केलेली असणे, मद्रास उच्च न्यायालयाने "जलस्त्रोतांवर कुणीही अतिक्रमण करु शकत नाही, जलस्त्रोतांचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाची आहे, असा निर्णय दिलेला असणे, याबाबत महापालिकेकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे रामाळा तलावाच्या आजूबाजूच्या परिसरात अतिक्रमण झालेले असणे, सबब, रामाळा तलावाचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी, नागरिकांनी शासनाकडे केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१६) | ६३८३ | १० | मौ.चोके, ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथील धरण, केटी बंधारा बांधण्याची ग्रामस्थांनी मागणी केली असणे, लहान धरण व केटी बंधारा बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, धरण व केटी बंधारा बांधण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ६४५२ | १० | मौ. शिवणीलख, ता.ओसा,जि.लातूर या तलावासाठी शेतकऱ्यांच्या जमीन संपादित केल्या असणे, मात्र शेतकऱ्यांच्या जमीन संपादित केल्या असणे, मात्र शेतकऱ्यांना अद्याप संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अदा केला नसणे, त्याचप्रमाणे पाझर तलावास तातडीने मान्यता देण्याच्या दृष्टीने व काम सुरु करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७०५, लाभक्षेत्र विकास**<br>**रूपये:- १७,८३,२१,६२,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१८) | ६४८४ | १० | मौजे धामापूर (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) गावातील शेतकऱ्यांच्या शेत जमिनींमध्ये कर्ली खाडीचे खारे पाणी भरतीच्या वेळी शेतात शिरुन शेत जमिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, खाडीच्या खाऱ्या पाण्यापासून शेतीचे संरक्षण करण्यासाठी गावातून वाहणाऱ्या पोईकालवा बंधाऱ्यावर प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन कायमस्वरुपी उघडझाप करणारी झडपे असलेला सिमेंटचा पक्का बंधारा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | बांधून देण्यासाठी, श्री.प्रशांत गंगाराम गावडे व इतर ग्रामस्थ यांनी खारभूमी विभागाकडून धामापूर पोईकालव्यावरील बंधाऱ्याचा बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी ‘उप कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग खारभूमी विकास विभाग, कणकवली सिंधुदूर्ग’ यांना नोव्हेंबर, २०२३ मध्ये शेतकऱ्यांच्या शेतजमिनींचे ७/१२ प्रतींसह निवेदन देणे, खारभूमी विभागाकडून धामापूर पोईकालव्यावरील बंधाऱ्याचा बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याबाबत शासकीय अधिकाऱ्यानी सातत्याने केलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, तसेच, शासनाच्या अस्तित्वातील व भविष्यकालीन योजनांमध्ये देखील सदर योजनेचा समावेश न करणे, सदर बंधारा जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग यांच्यामार्फत बांधण्यात आलेला असून त्याबाबत सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत तसेच, त्याबाबत योग्य कार्यवाहीस्तव सदरचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडून ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरीत करणे, पाठविण्यासाठी ‘उप कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग खारभूमी विकास विभाग, कणकवली सिंधुदूर्ग’ यांनी या कामात दिरंगाई केली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ४ जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) जलसंपदा विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई